**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** सातारा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0464 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**20/05/2026 23:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 20/05/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/05/2026

**Time From (वेळेपासून):** 16:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 20/05/2026 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 061

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 20/05/2026 23:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सिव्हील हस्पीटल सातारा, येथील रूम नं22 ब , ता जि सातारा येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री योगेश रमेश चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामकष्ण परमहंस सोसायटी सांगली,तामिरज जिंसागली,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामकष्ण परमहंस सोसायटी सांगली,तामिरज जिंसागली,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8108601919

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीनिवास गजानन जोशी | | | 1. दत्त रेसिडन्सी रुम न13 सोमवा,सातारा शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 20.05.2026

मी श्री. योगेश रमेश चव्हाण, वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न.8108601919

सरकारतर्फे फिंयादी होवुन देतो फिंयादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 19/05/2026 रोजी मी कार्यालयात हजर असताना पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे कार्यालयातून पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी संपर्क करून सातारा जिल्हयातील एका तक्रारदाराची तक्रार असून त्यांची तक्रार घेवून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार मॅडम यांनी तक्रारदार श्री.काटकर यांचा मोबाईल क्रमांक देवून त्यांना संपर्क करून त्यांचे तक्रार ऐकून घेवून पुढील कारवाई करण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.संभाजी काटकर, रा.सातारा यांना 17.27 वा चे सुमारास संपर्क करून त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील क्लार्क जोशी यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेचे सांगितले. त्यावेळी मी तक्रारदार यांना पथकासह उदईक दि.20/05/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता सातारा येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विंनती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना दि. 20/05/2026 रोजी सकाळी 07.30 वाजता एसीबी कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.20/05/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 07.40 वा चे सुमारास एसीबी कार्यालय सांगली येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/धनंजय खाडे, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/सुदर्शन पाटील असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अँथ्रासीन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 07.50 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, आष्टा, इस्लामपूर, पेठनाका, पुणे सातारा नॅशनल हायवे मार्गे सातारा येथे गोडोली चौक साई मंदीर येथे रोडकडेला सुरक्षित ठिकाणी 10.20 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे काही वेळात तक्रारदार श्री. काटकर हे त्यांचेकडील होंडा अँक्टीव्हा क्र.एमएच-11-सीव्ही-2320 वरून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. सिंध्दाथ श्रीकांत आमणे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. ऋषीकेश जालींदर बनसोडे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. काटकर यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये

तक्रारदार श्री. काटकर हे सातारा पोलीस दलामध्ये पोलीस नाईक या पदावर कार्यरत असून त्यांचे वडीलांचे उपचाराचे वैद्यकीय बिल वर्गवारी करीता सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे पाठविले आहे. सदर वैद्यकीय बिलामध्ये आजाराची वर्गवारी करून सदरचे बिल पोलीस अधीक्षक, कार्यालय सातारा येथे पाठविणेसाठी सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील क्लार्क श्री.जोशी यांनी एकुण 3 बिलाचे 20,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. काटकर यांनी यांचे सोबत आणलेला मराठीत टंकलिखीत केलेला लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे मध्ये " मी सातारा जिल्हा पोलीस दलामध्ये नोकरीस असुन जिल्हा विशेष शाखा सातारा येथे कार्यरत आहे. माझे आईवडील माझे मुळ गांवी त्रिपुटी ता.कोरेगांव जि.सातारा येथे राहणेस आहेत. माझे वडील श्री. कल्याण दिनकर काटकर, वय 79 वर्षे यांचा दिंनाक 29/09/2025 रोजी सकाळी 07.30 वाजता फिरण्याकरीता गेले असताना त्यांना अज्ञात मोटार सायकल स्वारने धडक दिल्याने त्यांचा अपघात झालेला होता. त्यानंतर त्यांना वेदांत हेल्थ केअर सेंटर सातारा येथे उपचारासाठी दाखल करुन त्यांचेवर सदर हॉस्पीटलमध्ये दिंनाक 01/10/2025 ते 07/10/2025 या कालावधीत उपचार करण्यात आले. सदर हॉस्पीटलकडुन अपघाताबाबत कोरेगांव पोलीस ठाणेस एम एल सी नं. 0373/2025 दिंनाक 01/10/2025 अन्वये कळविले असुन त्याबाबत पोलीस ठाणेस एम.एल.सी. 0352/2025 अन्वये दाखल आहे. वेदांत हेल्थ केअर सेंटर सातारा येथे आमचे उपचारार्थ पैसे खर्च झाले त्यापैकी 1,41,631/- रुपये रकमेचे बिल हॉस्पीटलने दिलेले आहे. दरम्यान उपचार घेवुन घरी आल्यानंतर माझ्या वडीलांना दिंनाक 29/10/2025 रोजी अचानक त्रास होवु लागल्याने त्यांना पुन्हा वेदांत हेल्थ केअर सेंटर सातारा येथे उपचारासाठी दाखल केले त्याठिकाणी एक दिवस उपचार घेतला त्यावेळी 23,722/- रुपये झालेल्या खर्चाचे बिल हॉस्पीटलने मला दिलेले असुन तेथील डॉक्टरांनी वडीलांना मुत्राशयाचा संसर्ग झाल्याने व जास्त त्रास होवु लागल्याने पुढील उपचाराकरीता साईअमृत मल्टिस्पेशालीटी हॉस्पीटल सातारा येथे जाण्याचे दिलेल्या सल्याप्रमाणे दिंनाक 30/10/2025 रोजी तेथे दाखल केले. त्याठिकाणी त्यांचेवर दिंनाक 30/10/2025 ते 10/11/2025 रोजी पर्यंत उपचार घेतले. त्यावेळी साईअमृत मल्टिस्पेशालीटी हॉस्पीटल सातारा येथे 3,23,672/- रुपये खर्चाचे बिल मला दिलेले आहे.

त्यानंतर दिंनाक 11/11/2025 रोजी वडीलांना पुन्हा त्रास होवु लागल्याने आम्ही पुढील उपचारार्थ त्यांना जरग हॉस्पीटल सातारा येथे अँडमीट केले. त्या ठिकाणी दिंनाक 11/11/2025 ते 18/11/2025 रोजी पर्यंत उपचार घेतले. त्यावेळी जरग हॉस्पीटल सातारा येथे 1,87,701/- रुपये खर्चाचे बिल मला दिलेले आहे.

वरील प्रमाणे प्रथम वेदांत हेल्थ केअर सेंटर सातारा येथील वैद्यकिय बिल रुपये 1,41,631/- व 23,722/- तसेच साईअमृत मल्टिस्पेशालीटी हॉस्पीटल सातारा येथील वैद्यकिय बिल रुपये 3,23,672/- असे एकुण 4,89,025/ रुपयांचा वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती होवुन मला मिळावा याकरीता मी वरील रकमेची तीन वेगवेगळी बिले सर्व उपचाराचे कागदपत्रांसह व प्रमाणपत्रांसह मा.पोलीस अधीक्षक सातारा यांना सादर केलेली आहेत.

मी सादर केलेली तिन बिले सिव्हील हॉस्पीटल सातारा कार्यालयात गेली असलेबाबत मला मा. पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन पत्र प्राप्त झाले. त्यानंतर मला घराचे बांधकामासाठी पैशांची गरज असल्याने मी बिंलाची चौकशी करण्याकरीता सिव्हील हॉस्पीटल येथे जावुन तेथे वैद्यकिय बिलाचे कामकाज करणारे श्री. जोशी क्लार्क यांना दिंनाक 28/04/2026 रोजी जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी माझी तिनही बीले आमचेकडे 794, 804, 805 या नंबरने आवक झाली असलेबाबत सांगितले. त्यावेळी मी त्यांना बिल कधीपर्यंत व कसे मंजुर होवुन मिळेलं असे विचारले त्यावर त्यांनी माझे तिन्ही बिंलाची कागदपत्रे तपासुन यामध्ये तुम्ही अपघाताबाबत तक्रार केलेली आहे का? एम एल सी दाखल आहे का? तुम्ही कोणाकडुन नुकसान भरपाई घेतली आहे का? असे प्रश्न मला विचारले. त्यावर मी त्यांना एम एल सी दाखल आहे परंतु आम्ही तक्रार कोठे दिलेली नाही, आम्हाला कोणाकडुनही भरपाई मिळालेली नाही असे सांगितले. त्यावर त्यांनी संपुर्ण तिनही बिंलाची रक्कम कॅल्क्युलेटरचे आधारे बेरीज करुन त्यातील 6 ऽ प्रमाणे 29,000/- रुपये मंजुरीसाठी द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर मी त्यांना, माझे पैसे जास्त गेलेले आहेत, हे जास्त होतात असे म्हणालो. त्यानंतर त्यांनी शेवट 20,000/- रुपये होतील असे सांगितले व अपघाताची तक्रार कोठे दिलेली नसल्याबाबत व कोणाकडुनही भरपाई मिळालेली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तेवढे आणून द्या, तुमचे बिल करुन टाकू असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझे वडीलांचे अपघाता बाबत अजुन एक बिल असून सदरचे बिल घेवून मी आपणास भेटण्यास येत असलेचे सांगितले होते.

त्यानंतर मी माझ्या वडीलांचे उपचारासाठी केलेले खर्चाचे जरग हॉस्पीटल सातारा येथील 1,87,701/- रुपयांचे बिलाची प्रतिपुर्वी होवुन मिळावी यासाठी मा.पोलीस अधीक्षक सातारा यांना सादर केलेले आहे. त्यावेळी मला

समजले की वैद्यकीय बिले इथून पुढे महाकर्मी या ऑनलाईन पोर्टलवर भरावयाचे आहे. त्यानंतर मी वडीलांचे अपघाताचे चौथे बिल दि.18/05/2026 रोजी महाकर्मी या ऑनलाईन पोर्टलवर भरून सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे बिलाची फाईल त्याच दिवशी जमा केली आहे.

मी आजरोजी माझे वडीलांचे अपघाताचे पुर्वी जमा केलेल्या एकुण तीन वैद्यकीय बिलांचे मंजुरीबाबत व दि. 18/05/2026 रोजी सादर केलेल्या वैद्यकीय बिला बाबत श्री. जोशी यांना भेटून चर्चा करणार आहे. त्यावेळी जोशी क्लार्क हे माझ्याकडे माझे वडीलांचे पुर्वी जमा केलेल्या एकुण तिन बिलांचे 20,000/- रूपये व दि. 18/05/2026 रोजी महाकर्मी पोर्टलवर सादर केलेल्या चौथ्या वैद्यकीय बिलासाठी माझ्याकडे आणखीन पैशाची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला श्री.जोशी क्लार्क यांना लाच देण्याची इच्छा नाही. तरी त्यांचेविरूध्द योग्य ती कारवाई व्हावी.

माझेत व श्री.जोशी क्लार्क सिव्हील हॉस्पीटल सातारा यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही " अशी हकीकत तक्रारी अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्री. जोशी, सिव्हील हॉस्पीटल सातारा यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही 11.59 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर व पंच क्र.1 श्री. सिंध्दाथ श्रीकांत आमणे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.05 वाजता सुरु करून तक्रारदार श्री.काटकर यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार श्री. काटकर व पंच नं.1 श्री. आमणे यांना सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे लोकसेवक श्री. जोशी, क्लार्क यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं.1 आमणे असे तक्रारदार यांचेकडील होंडा अॅक्टीव्हा क्र.एमएच-11-सीव्ही-2320 वरून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. काटकर व पंच नं.1 आमणे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 12.35 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. आमणे यांना, लोकसेवक जोशी, क्लार्क यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा. वरून रवाना होवून सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे दाखल झालो. त्यावेळी आम्ही कार्यालयाचे पार्किंगमध्ये मो.सा. पार्क करून तक्रारदार व मी असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील पहिल्या मजल्यावरील रूम नं.22 ब मध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार काटकर यांनी कार्यालयामधील एका आतील कक्षामध्ये टेबलापलीकडे बसले कर्मचारी यांचेजवळ जावून "जोशी साहेब नमस्कार" असे म्हणून त्यांचेशी वैद्यकीय बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी तक्रारदार व सदर कर्मचारी यांचे बोलणेवरून सदर कर्मचारी हे लोकसेवक श्री.जोशी असल्याचे माझी खात्री झाली.

त्यावेळी तक्रारदार श्री.काटकर यांनी जोशी क्लार्क यांना त्यांचे वडीलांचे चौथे एक बिल ऑनलाईनला भरले असल्याचे सांगितले. त्यावेळी जोशी क्लार्क यांनी त्यांचे कार्यालयातील एका कर्मचारी यास तक्रारदार यांचे बिल काढण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या कर्मचारी यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे वैद्यकीय बिलांची फाईल जोशी क्लार्क यांचेकडे दिली. त्यावेळी जोशी यांनी तक्रारदार यांची वैद्यकीय बिलांची फाईल तपासली.

त्यानंतर लोकसेवक जोशी यांनी तक्रारदार यांना "टोटलच सागू काय?" असे विचारले असता तक्रारदार यांनी "टोटलच सांगा की....जरा थोड व्यवस्थीत सांगा" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक जोशी यांनी तक्रारदार यांचे बिलाची चार फाईलमधील बिलांची रक्कम कॅलक्युलेटवर टाईप करून त्याचा हिशोब करून "तेहत्तीस होतात" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "किती?" असे विचारले असता लोकसेवक जोशी यांनी "तेहत्तीस...तुमच्या हयान बघा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "तेहत्तीस हजार....किती करु तरी" असे विचारले असता जोशी यांनी "मी काही सांगत नाही....मी फक्त तुम्हाला सांगायच काम केले...तुमच्या हयान करा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "तीस हजार करू" असे विचारले असता जोशी यांनी "तुमाला ज्याच्यात खुशी वाटते ते करा" असे

म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "चालतय...बर का...तीस हजार करतो" असे म्हणाले. त्यावर जोशी यांनी "चार वाजेपर्यंत या" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "हा येतो चार वाजे पर्यंत" असे म्हणून तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" अशी हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. काटकर व लोकसेवक श्री.जोशी, क्लार्क यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 मधील 260520इ1205 यामध्ये ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, लोकसेवक श्री. जोशी, क्लार्क यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे उपचाराचे एकुण 4 वैद्यकीय बिलांची वर्गवारी करून बिल पोलीस अधीक्षक, कार्यालय सातारा येथे पाठविणेसाठी तक्रारदार यांचेकडे 33,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 30,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच श्री.जोशी यांनी तक्रारदार यांना चार वाजता पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री. जोशी, क्लार्क यांचेविरूध्द दुपारी 16.00 वा नंतर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक असे काही वेळ तेथेच थांबून राहिलो.

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री. जोशी क्लार्क यांचेविरूध्द सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर यांना लोकसेवक जोशी यांनी मागणी केलेली 30,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार श्री. काटकर यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराचे 60 नोटा असे एकुण 30,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. मी तक्रारदार यांना सदरचे 30,000/- रूपये रक्कम कशी उपलब्ध केली याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी सदरची रक्कम त्यांचेकडील शिल्लक रक्कमेतील असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 30,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोकॉ/सुदर्शन पाटील यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिशयामध्ये ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. रेकॉर्डरमध्ये पडताळणी वेळची मेमरीकार्ड बाहेर काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही 16.12 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. काटकर, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक जोशी यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे डावे हाताने त्यांचे शर्टचे उजवे हातोब्याची घडी घालून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.22 वाजता सुरू करून लेसव्दारे तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून लोकसेवक जोशी यांची सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. काटकर व पंच नं. 1 श्री. आमणे असे तक्रारदार यांचेकडील होंडा अॅक्टीव्हा क्र.एमएच-11-सीव्ही-2320 वरून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. ऋषीकेश बनसाडे, पोना/धनंजय खाडे, पोशि/अजित पाटील व पोकॉ/सुदर्शन पाटील असे लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन

शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून रवाना झालो.

तक्रारदार व पंच नं.1 असे सातारा शहरामधून पोवई नाका मार्गे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे दाखल झाले. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/सुदर्शन पाटील यांनी आमचेकडील वाहन तक्रारदार यांचेकडील मो.सा. पासून काही अंतरावर कार्यालयजवळ थांबविली.

तक्रारदार व पंच नं.1 असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे चालत जावून पहिल्या मजल्यावर गेले. लागलीच मी, पंच नं.2, सापळा पथक असे सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो. तक्रारदार व पंच नं.1 हे पहिल्या मजल्यावरील 22 ब या रूममध्ये गेलेचे दिसले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री.काटकर सदर रूमचे बाहेर येवून त्यांचे डावे हाताने शर्टचे उजवे हातोब्याची घडी घालून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच मी व सापळा पथक असे तक्रारदार, व पंच नं.1 हे थांबले ठिकाणी गेलो. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोना/धनंजय खाडे यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.45 वा काढून घेवून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मी, सापळा पथक असे रूम नं.22 ब येथील कक्षामध्ये गेलो. त्यावेळी पंच नं.1 आमणे यांनी कक्षाचे आतील रूममध्ये असले इसमाकडे बोट दाखवून ते लोकसेवक श्री.जोशी असल्याचे सांगितले. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे अंमलदार खाडे यांनी लोकसेवक श्री. जोशी यांचा उजवा हात व पोकॉ सुदर्शन पाटील यांनी त्यांचा डावा हात मनगटजवळ घट्ट पकडला.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. जोशी यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. जोशी यांना आमची व सापळा पथकाची ओळख करून दिली. मी पंच नं.1 आमणे यांना लाच रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक जोशी यांनी त्यांचे टेबलचा डावे बाजुचा ड्रावर उघडून तक्रारदार यांना लाच रक्कम ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी लाच रक्कम ड्रावरमध्ये ठेवली. त्यावेळी जोशी यांनी लाच रक्कम हाताने दाबून ड्रावर बंद केला असल्याचे सांगितले.

मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 बनसोडे यांनी लोकसेवक यांचे टेबलचे डावे बाजुचे ड्रावरची तपासणी केली असता त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 60 नोटा मिळून आल्या. त्यानंतर पंच नं.2 बनसोडे यांनी सदर 500/- रूपये दराच्या नोटांचे नंबरची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. बनसोडे यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगितली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक जोशी यांची कक्षामध्ये जरूर तो अंधार करून अॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात त्यांचे हातांची व टेबलचे डावे बाजुचे ड्रावरची तपासणी केली असता जोशी यांचे उजवे हाताचे तळहातास व टेबलेचे डावे बाजूचे ड्रावरमध्ये ठिक-ठिकाणी अँथ्रॉसिन पावडर लागलेची हिरवट चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. जोशी त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. श्रीनिवास गजानन जोशी, वय-52 वर्षे, पद- सहाय्यक अधिक्षक, वर्ग-3 ग्रामीण रूग्णालय काशिळ, जि. सातारा, प्रतिनियुक्ती जिल्हा रूग्णालय सातारा. सध्या रा. दत्त रेसिडन्सी रूम नं.13, सोमवार पेठ सातारा जि.सातारा, मुळ रा. एमएसईबी रोड, अप्सरा ब्युटी पार्लरचे जवळ, गजानन हौसींग सोसायटी, कराड विटा रोड कराड, ता.कराड जि. सातारा असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक जोशी यांना तक्रारदार यांचे प्रलंबित कामाचे फाईलची विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे वैद्यकीय बिलाचे एकुण 4 फाईल्स व आवक रजिष्टर आमचे समक्ष हजर केले. सदरची कागदपत्रे व रजिष्टर आम्ही ताब्यात घेतली.

त्यानंतर आम्ही गोपनीयतेच्या दृष्टीने व कारवाईच्या सोईकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा येथे जाणेचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही लोकसेवक जोशी यांना ताबेत घेवून सिव्हील हॉस्पीटल सातारा येथून 17.10 वा चे सुमारास रवाना होवून 17.20 वा चे सुमारास लाचलुचपत प्रतिबधक विभाग, सातारा येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं.1 श्री. आमणे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा. वरून रवाना होवून सिव्हील हॉस्पीटल सातारा येथे दाखल झालो. त्यावेळी आम्ही मो.सा. पार्क करून सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील पहिल्या मजल्यावरील लोकसेवक श्री.जोशी यांचे 22 ब या कक्षामध्ये गेलो. त्यावेळी जोशी हे त्यांचे कक्षामध्ये हजर

नव्हते. काही वेळाने जोशी हे त्यांचे कक्षामध्ये आले. त्यावेळी तक्रारदार व मी असे त्यांचे कक्षामध्ये जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी जोशी यांनी तक्रारदार यांना "चार आहेत ना आपल....तयार करून ठेवलय सगळ...ऑनलाईनची पण काढली" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "झालय सगळ" असे विचारले असता जोशी यांनी "ह....त्याची काय काळजी करू नका फाईल आज होणार" असे म्हणून त्यांचे टेबलचा डावे बाजूचा ड्रावर उघडून तक्रारदार यांना हाताने खुणवून "ठेवा" असे म्हणून लाच रक्कम ड्राव्हरमध्ये ठेवण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने पॅन्टचे उजवे खिश्यातून बाहेर काढून "ड्राव्हरमध्ये?" असे विचारले असता जोशी यांनी "हो" असे म्हणालेने तक्रारदार यांनी लाच रक्कम त्यांचे टेबलचे डावे बाजुचे ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यावेळी जोशी यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने दाबून ड्राव्हर बंद केला.

त्यानंतर जोशी यांनी तक्रारदार यांना फाईल एस.पी.ऑफीसला पाठवू काय अशी विचारणा केली असता तक्रारदार हा..एस.पी.ऑफीसला पाठवा असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी जोशी यांना "मोजून घ्या...तीस हजार आहेत" असे म्हणाले. त्यावर जोशी यांनी "तो भाग महत्त्वाचा नाही...बिल देणे महत्त्वाच आहे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "चलू येवू साहेब" असे म्हणून त्यांचे कक्षामधून बाहेर येवून त्यांचा शर्टचे उजवे बाजुचा हातोबा त्यांचे डावे हाताने वर करून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच आपण व सापळा पथक असे आमचेजवळ आला." वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.काटकर यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग सातारा येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 20/05/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान, लोकसेवक श्री. श्रीनिवास गजानन जोशी, वय-52 वर्षे, पद- सहाय्यक अधिक्षक, वर्ग-3 ग्रामीण रूग्णालय काशिळ, जि. सातारा, प्रतिनियुक्ती जिल्हा रूग्णालय सातारा यांनी स्वत:चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे वडीलांचे उपचाराचे एकुण 4 वैद्यकीय बिंलाची वर्गवारी करून बिल पोलीस अधीक्षक, कार्यालय सातारा येथे पाठविणेसाठी तक्रारदार यांचेकडे 33,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 30,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लागलीच केले सापळा कारवाईवेळी लोकसेवक श्री. श्रीनिवास गजानन जोशी, वय-52 वर्षे, पद- सहाय्यक अधिक्षक, वर्ग-3 ग्रामीण रूग्णालय काशिळ, जि. सातारा, प्रतिनियुक्ती जिल्हा रूग्णालय सातारा यांनी सिव्हील हॉस्पीटल सातारा येथील पहिल्या मजल्यावरील रूम नं.22 ब येथील त्यांचे कक्षामध्ये आपले स्वत:चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाच रक्कम 30,000/- रूपये स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री.श्रीनिवास गजानन जोशी, वय-52 वर्षे, पद- सहाय्यक अधिक्षक, वर्ग-3 ग्रामीण रूग्णालय काशिळ, जि. सातारा, प्रतिनियुक्ती जिल्हा रूग्णालय सातारा. सध्या रा. दत्त रेसिडन्सी रूम नं.13, सोमवार पेठ सातारा जि.सातारा, मुळ रा. एमएसईबी रोड, अप्सरा ब्युटी पार्लरचे जवळ, गजानन हौसींग सोसायटी, कराड विटा रोड कराड, ता.कराड जि. सातारा यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
AVINASH dnyaneshwar MANE(I (Inspector)) / PSMH27226 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** AVINASH dnyaneshv

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PSMH27226

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):